# Important Release

**FOR IMMEDIATE RELEASE : 19/04/2021**

## व्हाट्सअ‍ॅप पिंक आणि फ्री 'नेटफ्लिक्स' च्या नावाखाली फेक लिंक्स व्हायरल होणे बाबत

गेल्या आठवड्याभरापासून व्हाट्सअ‍ॅपवर दोन प्रकारच्या लिंक्स व्हायरल होत आहेत -

१) **व्हाट्सअ‍ॅप पिंक -** हे डाउनलोड करा आणि हिरवे असलेले तुमचे व्हाट्सअ‍ॅप गुलाबी करा
२) **फ्री नेटफ्लिक्स -** हे डाउनलोड करा आणि नेटफ्लिक्स तसेच अन्य ओटीटी मोफत मिळवा
यासोबतच या लिंक्स इतरांना शेयर करण्यासही सांगितले जाते.

**धोका -**
या दोन्ही लिंक्स फेक असून, त्यावर क्लीक केल्यास ***"Online Stream"*** या नावाचे अ‍ॅप आपोआप मोबाईल मध्ये डाउनलोड होते. हे अ‍ॅप म्हणजेच एक प्रकारचा मालवेयर आहे. हे अ‍ॅप युजरचा मोबाईल आणि त्यात असलेले व्हाट्सअ‍ॅप 'हॅक' करण्यासाठी वापरले जाते. हे अ‍ॅप मोबाईल मध्ये डाउनलोड झाल्यावर वरील फेक लिंक्स आपोआप व्हाट्सअ‍ॅप ग्रुप मध्ये पाठवल्या जातात आणि तेही युजरच्या नावाने. काही कळायच्या आतच हे अ‍ॅप मोबाईलमधील व्हाट्सअ‍ॅपला नियंत्रित करू लागते. या 'Online Stream' अ‍ॅपमुळे मोबाईल मधील बँकिंग अ‍ॅप सुद्धा धोक्यात येऊ शकतात.

**उपाय -**
१) इंटरनेटवर कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही. त्यामुळे कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये.
२) अशा प्रकारे कोणत्याही अनोळखी लिंक्सवर क्लीक करू नये.
३) जर चुकून क्लीक झाले असल्यास त्वरित आपल्या मोबाईलच्या सेटिंग्स मध्ये जाऊन 'Online Stream' अ‍ॅप डाउनलोड झाले आहे का ते तपासावे.
४) जर 'Online Stream' अ‍ॅप डाउनलोड झाले असेल, तर ते लगेच Uninstall करावे.
५) तसेच व्हाट्सअ‍ॅप चॅटमधून ती लिंक डिलीट करून टाकावी.

**अत्यंत महत्वाचे -** हा मालवेयर सध्या केवळ अँड्रॉइड मोबाईलवरच हल्ला करत आहे. जर कोणत्याही व्हाट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये अशी लिंक कोणी टाकत असेल तर त्या व्यक्तीच्या मोबाईल मध्ये हा मालवेयर आला असण्याची शक्यता आहे. त्या व्यक्तीस त्वरित संपर्क करून 'Online Stream' अ‍ॅप काढून टाकण्यास सांगावे.